

आहे. त्यासाठी संबंधित जागेचा आराखडा तयार करण्याचे काम करण्यात येत आहे. रेल्वे विभागाच्या या योजनेमुळे गर्दीच्या वेळी रेल्वेस्थानकात आणि परिसरात होणारी वाहतूक कोंडी सुटण्यासाठी मोठी मदत होणार आहे.

पुणे रेल्वेस्थानकात मुख्य प्रवेशदारातून येणाऱ्या विविध प्रकारच्या वाहनांसाठी चार स्वतंत्र लेन आहेत. त्यात व्हीआयपी व पिकअप अँड ड्रॉपसाठी प्रत्येकी एक, तर रिक्षा, टॅक्सी व इतर वाहनांसाठी दोन लेन आहेत. मात्र, सकाळी आणि संध्याकाळी रेल्वे स्थानकात प्रवाशांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असल्याने तेथे ये-जा करणाऱ्या वाहनांची संख्या मोठी असते. त्या वेळी वाहतुकीच्या नियोजनाचा अभाव असल्याने नेहमीच वाहतूक कोंडी उद्भवते.

> **पुणे रेल्वेस्थानकात होणारी वाहतूक कोंडी सुटावी यासाठी रेल्वेस्थानकाच्या मुख्य इमारतीबाहेर असलेल्या जागेचा नवीन आराखडा तयार करीत आहोत. प्रवाशांना आणि वाहनचालकांना अधिकाधिक सोयीस्कर पडेल या उद्देशाने हा आराखडा तयार करण्यात येईल.**
>
> - **बी. के. दादाभोय**, रेल्वे व्यवस्थापक, पुणे विभा

# राष्ट्रवादीकडून आयुक्तांचा निषेध

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

राज्यसभेच्या खासदार आणि पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्षा वंदना चव्हाण यांच्याबद्दल महापालिका आयुक्त कुणाल कुमार यांनी केलेल्या वक्तव्याचा राष्ट्रवादी काँग्रेससह शहरातील विविध स्वंयसेवी संस्थांच्या वतीने निषेध करण्यात आला. महापालिकेचे प्रमुख म्हणून काम करताना लोकप्रतिनिधींना उद्धट म्हणण्याचा अधिकार आयुक्तांना कोणी दिला, असा प्रश्न उपस्थित करून अनेक स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनी नाराजी व्यक्त केली. अशा प्रकारची भाषा वापरणाऱ्या अधिकाऱ्याला पदावर राहण्याचा कोणताही अधिकार नसल्याचे स्पष्ट करून आयुक्तांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या संलग्न संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

शहरातील प्रलंबित प्रकल्प मार्गी लागावेत, यासाठी खासदार चव्हाण या पालिका आयुक्त कुमार यांच्याकडे गेल्या अनेक महिन्यांपासून पाठपुरावा करत आहेत. मात्र, आयुक्तांनी त्यांनाच दोषी ठरवून तुम्ही अत्यंत गर्विष्ठ आणि उद्धट राजकारणी असल्याचे पत्र त्यांना पाठविले. आयुक्तांनी [illegible]कारे लोकप्रतिनिधीला पत्र पाठवून त्यांच्याबद्दल असे वक्तव्य करणे अत्यंत चुकीचे असल्याचे स्वयंसेवी संघटनांच्या प्रतिनिधींनी सांगितले. 'नागरिकांनी लोकप्रतिनिधींना निवडून दिले असून, ते एक पुणेकर नागरिक असल्याचा विसर आयुक्तांना त्यांच्या पत्रात पडलेला दिसतो,' अशी टीका नागरी चेतना मंचाचे निवृत्त मेजर सुधीर जठार यांच्यासह सजग नागरिक मंचाचे विवेक वेलणकर, विश्वास सहस्त्रबुद्धे यांनी केली आहे. शहरातील अनेक महत्त्वाच्या समस्यांबाबत स्वयंसेवी संस्था पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करत असतात. मात्र, अनेकदा आयुक्त कुणाल कुमार या तक्रारींची दखलही घेत नसल्याचा आरोप या प्रतिनिधींनी केला. नागरिकांनी केलेल्या तक्रारीकडे वारंवार दुर्लक्ष करण्याची भूमिका घेणे हा पुणेकरांचा अपमान असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

खासदार चव्हाण यांचा अपमान हा सर्व लोकप्रतिनिधींचा अपमान असून, राज्य सरकारने तातडीने महापालिका आयुक्त कुमार यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली. राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अशोक राठी, चिटणीस नितीन जाधव, पुणे शहर क्रीडा सेल अध्यक्ष विपुल म्हैसुरकर, संघटक सचिव रामदास गाडे, पक्षाचे सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष आनंद रेठे, शहर विद्यार्थी अध्यक्ष राकेश कामठे, ज्येष्ठ नागरिक संघटनेचे दादासाहेब सांगळे, अल्पसंख्यांक विभागाचे इक्बाल शेख, लीगल सेलचे उपाध्यक्ष औदुंबर खुने पाटील यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांकडे ही मागणी केली आहे.

चव्हाण यांच्यावर केलेल्या आरोपांप्रकरणी आयुक्त कुणालकुमार यांची बदली करावी, अन्यथा त्यांच्याविरोधात जनमत संघटित करावे लागेल, असा इशारा राष्ट्रवादीचे म. वि. अकोलकर, रवींद्र माळवदकर, अशोक राठी आदींनी दिला आहे.

### 'हा पुणेकरांचा अपमान'

आयुक्त कुणाल कुमार नागरिकांच्या तक्रारींची दखलही घेत नाहीत, हा पुणेकरांचा अपमान आहे. नागरिकांच्या तक्रारींमध्ये पाण्याचे असमान वाटप, बिघडलेले कचरा व्यवस्थापन, नदी-नाल्यांवर वाढती अतिक्रमणे, मोहल्ला कमिटीतील विषय यांचा समावेश असल्याचे सजग नागरिक मंचाने स्पष्ट केले आहे.